## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस
### (फक्त सभासदांकरिता)

बँकेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, विद्यानंद को.ऑप बँक लि. सोलापूर या बँकेची २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवार दि. २२ सप्टेंबर २०२२ रोजी सकाळी ठिक १०.०० वाजता **''गांधी नाथा रंगजी दिगंबर जैन जनमंगल प्रतिष्ठान''** बाळीवेस, सोलापूरच्या प्रांगणातील हॉलमध्ये बोलविण्यात येत आहे. सदर सभा खालील विषयांवर विचारविनिमय करुन निर्णय घेण्यासाठी आयोजित केलेली आहे. तरी सदर सभेस सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, हि नम्र विनंती.

**✻ सभेपुढील विषय ✻**

०१. मागील दि. ३० सप्टेंबर २०२१ रोजी झालेल्या २४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.

०२. सन २०२१-२२ या वर्षाचा वार्षिक अहवालातील वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेले ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्विकारणे व मंजुरी देणे. तसेच मा.वैधानिक लेखापरिक्षक यांचेकडुन आलेला वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.

०३. सन २०२०-२१ सालाचा वैधानिक लेखापरिक्षणाचा दोष दुरुस्ती अहवाल माहिती व मंजूरीसाठी

०४. मा.संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२१-२०२२ च्या नफा वाटणीस मंजुरी देणे.

०५. सन २०२२-२०२३ सालाकरिता मा.संचालक मंडळाने तयार केलेले उत्पन्न व खर्चाचे अंदाज पत्रक मंजूर करणे व सन २०२१-२०२२ च्या अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मजूरी देणे.

०६. सन २०२२-२०२३ सालाकरीता वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूकीस व त्यांच्या मानधनास मंजुरी देणे.

०७. महाराष्ट्र शासनाने नागरी सहकारी बँकांना लागु केलेल्या एकरकमी कर्ज परतफेड योजना व तडजोड योजनेअंतर्गत थकीत कर्जदारांना व्याजात दिलेले सुट रक्कमेस मान्यता देणे.

०८. वैधानिक लेखापरिक्षकांचे मान्यतेने. वसुलीचा हक्क अबादित ठेवून १००% तरतुद असलेल्या थकबाकिदाराच्या रकमांचे निर्लेकण करणे.

०९. सन २०२२-२०२३ मध्ये बँकेचे सभासद व कर्मचारी यांचेसाठी सहकारी शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रम राबविणेबाबत विचार करणे.

१०. बँकेच्या सदर वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहू न शकणाऱ्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे.

११. मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर विचार करणे.

**सोलापूर.**
**दि. ०६ सप्टेंबर २०२२**

**श्री. सुधीर शरदचंद्र गांधी**
अध्यक्ष

**✻ सूचना ✻**

१) किमान गणेसंख्ये अभावी सभा तहकुब झाल्यास ती सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी ठरलेल्या वेळेनंतर अर्ध्यातासाने सुरु होईल. त्यासाठी कोरमची आवश्यकता भासणार नाही.
२) वार्षिक अहवालाची प्रत बँकेच्या सर्व शाखांमध्ये व बँकेच्या वेबसाईटवर (www.vidyanandbank.com) उपलब्ध राहील.
३) दि.३१ मार्च २०२२ अखेरच्या ताळेबंद, नफा-तोटा पत्रकासंबंधी काही माहिती विचारावयाचे असल्यास त्यांनी दि. १५ सप्टेंबर २०२२ पर्यंत कार्यालयीन वेळेत बँकेच्या प्रत्येक शाखा व्यवस्थापकांकडे लेखी कळवावे. त्यानंतर आलेल्या प्रश्नांचा विचार केला जाणार नाही.

**✻ विशेष सूचना ✻**

१) ज्या सभासदांनी खातेस वारस नेमून दिलेली नसतील किंवा ज्यांना वारस नेमुन द्यावयाचा असेल त्यांनी नॉमिनी फॉर्म भरुन देऊन बँकेत दाखल करण्याची व्यवस्था करावी.

२) २० वी वार्षिक सर्वसाधारण सभा विषय नं.११ (०२) नुसार ज्या सभासदांनी जुने भाग प्रमाणपत्र जमा करुन नविन भाग प्रमाणपत्र करण्याकरिता दिले होते ते प्रमाणपत्र तयार झाले असून मुख्य शाखेतून घेऊन जावे.

३) आपल्या बँकेनी मा.आर.बी.आय. च्या मार्गदर्शक सुचनेनुसार C-KYC प्रणालीची अंमलबजावणी केलेली आहे. ज्या सभासदांनी व खातेदारांनी अद्याप C-KYC अद्यायावत केलेली नाही. त्यांनी पॅन कार्ड, आधार कार्ड व कलर फोटो यांची प्रत नजीकच्या शाखेत जमा करण्यात यावी.

४) आपला पत्ता बदललेला असल्यास नविन पत्ता, टेलिफोन व मोबाईल नंबर बँकेस लेखी स्वरुपात त्वरीत कळवावे.
५) कृपया सभासदांनी सभेस येताना आपली नोटीस प्रत घेऊन यावी.